पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- १५/११/२०१९*

## भरधाव वेगाने चारचाकी वाहन चालवुन सायकल स्वार व्यक्तीस धडक देण्याऱ्या आरोपीस ३ महिने कारावास व १,०००/- रु. दंडाची शिक्षा

=> श्री. एच.पि. पंचोली न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. गडचिरोली यांचे न्यायालयाचा न्याय निर्वाळा

आरोपी आशीष टिकाराम रोहनकर वय २८ वर्ष रा. सोनापुर कॉम्पलेक्स वार्ड क्र. १४ ता.जि. गडचिरोली याने दिनांक १६/०५/२०१९ रोजी याने स्वता: चा ताब्यातील हुंडाई कार क्र. एम.एच. ३३ ए- ५७३५ या वाहनाने आरमोरी वरुन गडचिरोली ला येत असतांना भरधाव वेगाने हयगयीने व निष्काळजीपणे वाहन चालवुन वाहनावरील नियत्रंण सुटल्याने वाहनाची पलटी होवुन रस्त्याचा दुभाजकावर जाणाऱ्या सायकल स्वारास धडक देवुन अपघात झाला. अश्या फिर्यादी वरुन पोस्टे गडचिरोली, अप.क्र. २६५/२०१९ कलम २७९,३३७,३३८ भा.द.वि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता.

आज दिनांक १४/११/२०१९ रोजी श्री. एच.पि. पंचोली न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी गडचिरोली यांचे न्यायालयाने आरोपी आशीष टिकाराम रोहनकर यास कलम २७९, ३३७ भा.द.वि. व कलम १८४ अन्वये तीन महिने साधा कारावासाची शिक्षा, व १,०००/- रु. दंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

सदर गुन्हाचा तपास सफौ./शशीकर चिचघरे यांनी पोलीस निरीक्षक, प्रदिप चौगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली योग्य रितीने तपास करुन दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.